*रयत शिक्षण संस्थेचे,*

# अण्णासाहेब आवटे कॉलेज मंचर,पुणे.

## शारीरिक शिक्षण विभाग आयोजित राष्ट्रीय वेबिनर

"Career Opportunities in Military and Defence Services"

कोरोना काळात सद्य स्थितीचा आढावा घेता अनेक उदयोग धंदे बंद होत चालले आहेत.नाईलाजास्तव अनेक क्षेत्रात कामगार कपातीचे सकट डोके वर काढत आहे.तरुण मुलांना भविष्याची चिंता सतावत आहे हाच दृष्टीकोण लक्षात घेऊन महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण विभाग आणिस्पर्धा परीक्षा व करिअर मार्गदर्शन केंद्र समितीयांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण व शहरी भागातील १० वी,१२ वी व पदवीच्या विद्यार्थासाठी"Career Opportunities in Military and Defence Services" (Army,Navy&AirForce) या विषयावर सेवा निवृत्त कर्नल एन शरद भंडारे याचे व्याखान मंगळवार दिनाक ११/८/२०२१रोजी सकाळी ११ : ०० वाजता कर्मवीर सभागृहामध्ये ऑनलाईन स्वरुपात आयोजित केले होते.

कर्नल भंडारी यांनी आपल्या व्याखानात आर्मी,नेव्ही व एयर फोर्समध्ये निवड होण्यासाठी कोणत्या प्रकारच्या परीक्षा व कोणामार्फत घेतल्या जातात याचे सविस्तर विवरण केले. मा.उदय पाटील साहेबांनी मार्गदर्शन करताना एन डी ए मधील प्रशिक्षणाचा अनुभव व प्रशिक्षणानंतर मिळणाऱ्या सुविधाची सखोल माडणी केली .तर मा. प्राचार्यांनी आपले विचार माडताना आर्मी भरती होताना स्वतचा अनुभव विद्यार्थ्यांना सागुण जास्तीत जास्त विद्यार्थिनी व विद्यार्थ्यानी सैन्यात भरती व्हावे असे आवाहन केले.

सदर कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयीन विकास समितीचे सदस्य मा.श्री उदय पाटील तर अध्यक्ष स्थानीमहाविद्यालयाचे प्राचार्य मा .डॉ. के. जी कानडे उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक प्रा.डॉ. सुनिल पानसरे यांनी केले, कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. अडसरे व्ही. बी. व सूत्रसंचालन प्रा. महाकाल एम. सी. व प्रा. गावित यांनी केले. या कार्यक्रमासाठी (ऑनलाईनवेबिनारसाठी)महाविद्यालयातील २५६ विद्यार्थी ऑनलाईनद्वारे उपस्थित होते.

प्रा .डॉ .सुनिल पानसरे
शारीरिक शिक्षण सचालक

ANNASAHEB AWATE COLLEGE, MANCHAR